**ठळक बातम्या**

- इस्रोच्या पीएसएलव्ही-C-62 अंतराळ यानाचं उड्डाण येत्या १२ जानेवारीला
- देशातल्या एकंदर ५० हजार आरोग्य सुविधांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानक प्रमाणपत्र
- छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज २६ नक्षलींचं आत्मसमर्पण
- अमेरिका व्हेनेझुएलाकडून सुमारे ३ ते ५ कोटी बॅरल इंधन तेल ताब्यात घेणार

**आणि**

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीत दाखल

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था- इस्रोच्या पीएसएलव्ही-C-62 अंतराळ यानाच उड्डाण येत्या १२ जानेवारीला होणार आहे. आंध्र प्रदेशात श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्राच्या तळावरुन सकाळी १० वाजून १७ मिनिटांनी हा प्रक्षेपक अंतराळात झेपावेल अशी माहिती इस्रोनं समाज माध्यमावर दिली आहे. या मोहिमेतील मुख्य पेलोड म्हणजे पृथ्वी निरीक्षण उपग्रह EOS-N1 हा आहे. हा उपग्रह संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेसाठी छायाचित्रे घेण्याचं काम करणार आहे. या प्रक्षेपकाद्वारे भारतासह इतर देशांचे १८ उपग्रह अंतराळात पाठवण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

देशातल्या एकंदर ५० हजार आरोग्य सुविधांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानक प्रमाणपत्र मिळाल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे. यामुळे सुरक्षा, रुग्णांची काळजी याप्रति सरकारची वचनबद्धता अधोरेखित होत असल्याचं आणि समान आणि चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा सर्वांना उपलब्ध होत असल्याचं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

२०२५ हे वर्ष भारतासाठी सुधारणांचं वर्ष ठरलं. कामगार कायदे, कररचनेत बदल, बंदरांचं आधुनिकीकरण, परकीय गुंतवणूक आणि मुक्त व्यापार करार अशा महत्त्वाच्या सुधारणा झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतीमान झाली. यामुळे भारताचं सकल

राष्ट्रीय उत्पादन ८ पूर्णांक २ दशांश टक्क्यापर्यंत वाढलं. याविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**--------व्हीसी----------**

(*कामगार कायद्यातला बदल ही भारतासाठी या वर्षातली सर्वात महत्त्वाची सुधारणा ठरली. २९ कामगार कायदे एकत्र करून त्याचं चार कामगार संहितांमधे रुपांतर करण्यात आलं. यामुळे उद्योग-व्यवसायाच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झालं. योग्य वेतन, अधिक सुलभ औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता यामुळे ६४ कोटींपेक्षा अधिक कामगारांसाठी कामगारस्नेही बाजारपेठ तयार होण्याचा मार्ग मोकळा झाला. शिवाय, महिलांचा सहभाग वाढण्यासही प्रोत्साहन मिळालं. जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कर प्रणालीत ५ आणि १८ टक्क्यांचे दोन स्लॅब केल्यामुळे ती अधिक सुलभ झाली. लघु आणि सूक्ष्म उद्योग, शेतकरी, आणि कामगार यांच्यावरला ताण कमी व्हायला यामुळे मदत झाली. याचा सकारात्मक परिणाम होऊन दिवाळीत ६ ट्रिलियनपेक्षा जास्त विक्रीचा विक्रम झाला. कररचनेत बदल केल्यामुळे भारतीय मध्यमवर्गाला दिलासा मिळाला. वार्षिक १२ लाखापर्यंत उत्पन्नावर करमाफी केल्यामुळे मध्यमवर्गीय नागरिकांना बचत आणि गुंतवणुकीची संधी मिळाली. याशिवाय जनविश्वास सुधारणा केल्यामुळे उद्योग आणि सरकार यांच्यात परस्पर विश्वासाचं वातावरण निर्माण झालं. निरस्तीकरण आणि सुधारणा विधेयक २०२५ द्वारे तब्बल शंभरहून अधिक कालबाह्य कायदे रद्द केले गेले, त्यामुळे देशानं परिवर्तनाचा एक नवा टप्पा गाठला आहे.*)

**<><><><><>**

विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एसआयआर(SIR) अंतर्गत निवडणूक आयोगाने उत्तर प्रदेशसाठी प्रारूप मतदार यादी काल लखनौमध्ये प्रसिद्ध केली. या प्रारूप मतदार यादीमध्ये 12 कोटी 55 लाख 56 हजार पेक्षा अधिक मतदारांची नावं आहेत. 81 टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांनी आपले अर्ज भरून नवीन प्रारूप मतदार यादीसाठी नावं नोंदवली आहेत. उत्तर प्रदेशचे राज्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी माध्यमांना ही माहिती दिली.

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नवीन प्रारूप मतदार यादीत एकूण 2 कोटी 89 लाख मतदारांची नावे न आढळल्यानं एकंदर 19 टक्के नागरिकांची नावे मतदार यादीतून

वगळण्यात आली आहेत. विशेष पडताळणी मोहिमेदरम्यान 46 लाख 23 हजार मतदार, म्हणजेच एकंदर 3 टक्के मतदारांचं निधन झाल्याचं आढळलं. यादीविषयी दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी येत्या 6 फेब्रुवारीपर्यंत आहे.  27 फेब्रुवारीपर्यंत त्यावर निर्णय घेतला जाईल. अंतिम  मतदार यादी 6 मार्च रोजी प्रसिद्ध होईल.

<><><><><>

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज लातूरमध्ये येत असून, टाऊन हॉल इथं त्यांची जाहीर सभा होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुण्यात शिवाजीनगर, कसबा, कोथरुड, पर्वती परिसरात रोड शो च्या माध्यमातून प्रचार करत आहेत.

शिवसेना नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज अकोल्यात प्रचारसभा होणार आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २६ नक्षलींनी आत्मसमर्पण केलं. यातल्या १३ जणांवर एकूण ६५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगडच्या पुनर्वसन योजने अंतर्गत या नक्षलींनी पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करल्याचं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. हे नक्षली पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे सदस्य होते, ओदिशा आणि आंध्रप्रदेशातल्या अनेक कारवायांमधे त्यांना सहभाग होता. या सर्वांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसंच पुनर्वसन धोरणानुसार मदत दिली जाईल, असं चव्हाण यांनी सांगितलं. छत्तीसगडच्या धमतारी जिल्ह्यात कालही एका नक्षली महिलेनं आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

<><><><><>

व्हेनेझुएला अमेरिकेकडे ३ ते ५ कोटी बॅरल तेल हस्तांतरित करेल, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. हे तेल बाजारभावाने विकलं जाईल याची आपण स्वतः काळजी घेऊ, हे दोन्ही देशांच्या फायद्याचं आहे, असं ट्रम्प समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हणाले. व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना

ताब्यात घेतल्यानंतर अमेरिका व्हेनेझुएलातल्या तेल, व्यापार आणि सुरक्षेचं नियमन करत आहे, असं त्यांनी सांगितलं.

दुसरीकडे अमेरिकेच्या हल्ल्याच्या निषेधार्थ व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रीग्ज यांनी देशात शोक सप्ताह पाळण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेने केलेल्या लष्करी कारवाईत ५६ जणांचा मृत्यू झाला, यात क्युबाच्या ३२ लष्करी जवान आणि पोलिसांचा समावेश असल्याचं व्हेनेझुएलाने म्हटलं आहे. व्हेनेझुएलाचं सरकार देशाचं कारभार बघणार असल्याचं रॉड्रीग्ज यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

गेली अनेक दशकं दहशतवादी कारवायांना आश्रय दिल्याबद्दल भारतानं पाकिस्तानवर कटोर टीका केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल लक्झेंबर्ग इथं पत्रकारपरिषदेत सांगितलं की पाकिस्तानने केवळ दहशतवादाला आसरा दिला असं नव्हे तर दहशतवाद सामान्य असल्याची भावना निर्माण केली. यामुळे भारताचं धोरण पाकिस्तानप्रति इतर देशांपेक्षा वेगळंच राहणार आहे.

<><><><><>

भारताची अग्रमानांकित बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं मलेशिया खुल्या सुपर 1000 स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत सिंधूनं चायनीज तैपेईच्या सुंग शुओ युन हिचा २१-१३,२२-२० असा पराभव केला.

दुसऱ्या फेरीत सिंधूची लढत जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्याशी होणार आहे. सिंधूच्या पायाला गेल्यावर्षी दुखापत झाली होती. त्यातून बरे झाल्यानंतर पहिल्यांदाच सिंधू आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाली आहे.मालविका बनसोडला मात्र  पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला.

पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेननं सिंगापूरच्या खेळाडुला २१–१६, १५–२१, २१–१४ असं हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

नवी दिल्लीत येत्या १३ ते १८ जानेवारी दरम्यान इंदिरा गांधी इनडोअर स्टेडिअमवर योनेक्स-सनराईज इंडिया ओपन सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेला सुरुवात होणार

आहे. यंदा भारतीय संघात किदांबी श्रीकांत, एच. एस. प्रणॉय आणि मालविका बनसोड यांचा समावेश  आहे.

स्पर्धेच्या महिला एकेरी प्रकारात पहिल्या फेरीत गतवर्षीची विजेती पी. व्ही. सिंधू हिचा सामना व्हिएतनामच्या थुई लिन्ह गुयेन हिच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

उत्तर भारतात थंडीची लाट कायम असून, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि मध्य प्रदेशसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. कडाक्याची थंडी आणि दाट धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून, राजस्थान आणि वाराणसीमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**